प्रशासकीय कायदा
(मराठी रुपांतर)
(३ तास)

**QP Code : 13019**

एकूण गुण : १००

सूचना :
१. सर्व प्रश्न अनिवार्य आहेत
२. उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.
३. उत्तरांना न्यायनिर्णयाचा संदर्भ द्या.
४. मराठी रुपांतराचे आकलन न झाल्यास इंग्रजी प्रश्नपत्रिका कृपया पहावी.

प्र.१ थोडक्यात उत्तरे लिहा (दोन ओळींपेक्षा जास्त नाही) २० गुण

अ) Droit Administratif म्हणजे काय ?

ब) शासकीय कराराच्या अत्यावश्यक बाबी सांगा?

क) दुय्यम प्रत्यायोजिता (Sub-Delegation) म्हणजे काय?

ड) Henry VIII clause (उपवाक्य) म्हणजे काय?

ई) स्पष्टादेश (Speaking Order) म्हणजे काय?

फ) वैध अपेक्षेचे सिध्दांत (Doctrine of Legitimate Expectation) म्हणजे काय?

ग) महामंडळाचे किती प्रकार आहेत?

ह) डेलिगेटस नॉन पोटेस्ट डेलिगर याचा अर्थ स्पष्ट करा?

स) प्रमाणबध्दतेचे तत्व (Doctrine of Proportionality) म्हणजे काय?

द) केंद्रीय लोकसेवा आयोगाची दोन कार्ये लिहा?

प्र. २ थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही चार) २० गुण

अ) प्रतिष्टंभाचे तत्त्व (Doctrine of Estoppels)

ब) ए. के. कृपाक प्रकरण

क) करारामध्ये शासनाचे दायित्व (Liability of Govt. in a contract)

ड) केंद्रिय दक्षता आयोग

ई) कायद्याचे राज्य (Rule of Law)

फ) अल्ट्रा व्हायर्स चे तत्त्व सांगा

...2/

[TURN OVER

**FN-Con. 2394-15.**

munotes.in
MUPD15204 K.C.Law College 09-04-2015 14:23:59
MUPD15204 K.C.Law College 09-04-2015 14:23:59

प्र. ३ सोडवा (कोणतेही दोन) १२ गुण

अ) नागरिकांना शासनातर्फे सामाजिक सेवा देण्यासाठी जी महामंडळे निर्माण केलेली आहेत ती वाणिज्यिक स्वरुपाची नाही आणि म्हणून अशी महामंडळे आर्थिकदृष्ट्या सक्षम असण्याची अपेक्षा नाही. अशा महामंडळांचा उद्देश सामाजिक सेवा देण्याचा असल्यामुळे अशी महामंडळे नफा कमावण्यासाठी चालविलीच पाहिजेत असेही बंधन नाही.

(१) महामंडळाचे कोणकोणते प्रकार आहेत?

(२) अशा सार्वजनिक महामंडळांचे सदस्य हे सार्वजनिक सेवक असतात का?

ब) शासनाने, शैक्षणिक संस्था कॅपिटेशन फी ला बंदी घालणे कायदा, १९८४ अंतर्गत नियम गठीत केले. कायद्यांने कॅपिटेशन फी घेण्याला बंदी घातली आहे मात्र नियमामध्ये फी घेण्याची तरतूद असून, अशी फी खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाने घ्यावी असा उल्लेख आहे आणि अशी फी, ही टयुशन फी नसून कॅपिटेशन फी आहे. नियमामध्ये अशी तरतूद आहे की, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांसाठी रुपये २००० /- तर कर्नाटक व कर्नाटकाबाहेरील गुणवत्ता नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी अनुक्रमे रुपये २५,००० आणि रुपये ६०,०००/- अशी फी आहे.

(१) अशा प्रकारे वेगवेगळया विद्यार्थ्यांच्या गटासाठी वेगवेगळे फी आकारण्याची पध्दतीविषयक नियम वैध आहेत काय हे स्पष्ट करा ?

(२) अशा नियमावर प्रत्यायोजित विधिविधानान्वये कशाप्रकारे नियंत्रण ठेवता येते?

क) डॉ. बोनहम हे केंब्रिज विद्यापीठाचे डॉक्टर असून त्यांना फिजिशियन्स महाविद्यालयाने लंडन शहरामध्ये परवाना नसताना व्यवसाय केल्याबद्दल दंड केला होता, परंतु ज्या कायद्याखाली त्यांना दंड करण्यात आला त्या कायद्याखाली अशी तरतूद होती की दंडाची अर्धी रक्कम ही राजाला जात होती तर अर्धी रक्कम ही केंब्रिज विद्यापीठाला जात होती.

(१) या उदाहरणामध्ये कायद्याचे कोणते तत्व अंमलात आणले गेले?

(२) "कल (Bias)" चे किती प्रकार आहेत?

... 3/-

[TURN OVER



munotes.in
MUPD15204 K.C.Law College 09-04-2015 14:23:59

प्र. ४ खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही चार) ४८ गुण

अ) प्रशासकीय कायद्याची व्याख्या द्या. प्रशासकीय कायद्याची भारतातील व्याप्ती व विस्तार स्पष्ट करा.

ब) नैसर्गिक न्यायाच्या विविध तत्वांची चर्चा करा?

क) प्रत्यायुक्त विधिविधान (Delegated Legislation) म्हणजे काय? प्रत्यायुक्त विधिविधानावर न्यायिक नियंत्रणाची पध्दती विशद करा?

ड) "ओंबूड्मन" या संस्थेविषयी माहिती द्या?

ई) भारतात न्यायाधिकरणाच्या वाढीची कारणे स्पष्ट करा. न्यायाधिकरण व न्यायालय यातील फरक सांगा?

फ) लेजिटिमेट एक्सपेक्टेशन या संकल्पनेची चर्चा करा.

*****

munotes.in

MUPD15204 K.C.Law College 09-04-2015 14:23:59

MUPD15204 K.C.Law College 09-04-2015 14:23:59